**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** दहीवडी
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0407  **Year (वर्ष):** 2025
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/11/2025 03:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 06/11/2025
      **Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/11/2025
      **Time From (वेळेपासून):** 17:25 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:25 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 07/11/2025  **Time (वेळ):** 03:16 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 004
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2025 03:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 0.3 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** मौजे दहिवडी तामाण,गावचे हद्दीतएस टी स्टण्ड ,जवळील झुंबड हटेल येथे

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
   (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल दाजी पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गोळीबार मैदान गोडोली,सातारा,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गोळीबार मैदान गोडोली,सातारा,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8308469377

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल अंगदराव महालिंगे | | | 1. कोळकी ,फलटण,फलटण शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 06/11/2025

मी सुनिल दाजी पाटील वय 38 वर्षे, व्यवसाय - पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. रुद्रांश हाईट्स, रुम नंबर 13, गोळीबार मैदान गोडोली, सातारा ता.जि.सातारा मुळ रा. मु. थावडे पो. सोंडोली, ता. शाहुवाडी जि.कोल्हापुर मोनं - 8308469377

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 06/11/2025 रोजी श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास कळविले की, तक्रारदार प्रकाश तात्याबा शिंदे रा. दहिवडी ता.माण जि.सातारा यांची नवीन विज कनेक्शन देण्यासाठी महालिंगे लायनमन, एमएसईबी ऑफिस दहिवडी हे लाचेची मागणी करत असलेबाबत तक्रार फोनव्दारे कळविली असून सदर तक्रारदार संपर्क करतील त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

दिनांक 06/11/2025 रोजी सकाळी 08.17 वा. तक्रारदार प्रकाश शिंदे यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन आम्हाला संपर्क केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे नवीन विज कनेक्शन देण्यासाठी महालिंगे लाईनमन एमएसईबी ऑफिस दहिवडी हे लाचेची मागणी करत असलेबाबत तक्रार सांगीतली व तक्रारीवर दहिवडी ता.माण जि.सातारा येथे येवुन कारवाई करणेबाबत विनंती केली. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना सनी ग्राउंड दहिवडी येथे 10.00 वा. हजर राहण्यास सांगीतले. त्यानुसार सापळा पथकामध्ये पोहवा ताटे, राजपुरे, पोशि थोरात, पोशि शिंदे व शासकीय वाहन क्रमांक एम एच 11 डी एच 8213 चालक पोहवा पुजारी यांना सापळा पथकात सामील करण्यात आले. तसेच तहसील कार्यालय कोरेगाव येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या. नमुद शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथुन बाहेर पडुन कोरेगाव येथे 9.00 वा. पोहोचलो. तेव्हा तहसील कार्यालय कोरेगाव येथे उपस्थित असलेल्या पंचांना नाव विचारले असता 1. सोमनाथ गंगाराम देशमुख, महसुल सहायक, तहसील कार्यालय कोरेगाव 2. दिपक सुधिर गुरव, महसुल सहायक, तहसील कार्यालय कोरेगाव असे सांगुन ते पंच म्हणुन उपस्थित असल्याचे सांगीतले. आम्ही दोन्ही पंचांना सापळा पथकाची ओळख करुन दिली तसेच तक्रारदार श्री. प्रकाश शिंदे हे दहिवडी ता.माण येथे थांबलेले असुन दहिवडी ता.माण जि.सातारा येथे जावुन सापळा कारवाई करणार असल्याचे दोन्ही पंचांना सांगितले.

त्यानंतर आम्ही, सापळा पथक व दोन शासकीय पंचासह सनी ग्राउंड दहिवडी ता.माण जि.सातारा येथे 10.10 वा. पोहचलो त्यावेळी एक इसम टीव्हीएस आयक्युब दुचाकी वाहन क्रमांक एम एच 11 डी एल 7649 वर हजर होता. तेव्हा त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश तात्याबा शिंदे, वय 43 वर्षे, व्यवसाय इलेक्ट्रीक दुकान, रा. दहिवडी ता.माण जि.सातारा असल्याचे सांगीतले व ते तक्रारदार असल्याचे सांगीतले. सदर वेळी तक्रारदार प्रकाश शिंदे व नमुद दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. प्रकाश शिंदे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. सोमनाथ गंगाराम देशमुख पंच क्र.2 म्हणून श्री. दिपक सुधिर गुरव हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी बिदाल रोड, शिर्के वस्ती, दहिवडी, ता. माण जि. सातारा येथे कुटुंबासोबत राहणेस आहे. माझे शिक्षण 09 वी झालेले आहे. मला मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान आहे. माझा इलेक्ट्रॉनिकस व इलेक्ट्रीकलचा व्यवसाय असुन माझे स्वत: चे प्रविण इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रीकल्स नावाने दहिवडी ता. माण येथे दुकान आहे.

सध्या मी माझा मित्र अनिल भोसले याचे नावे असलेल्या वीज मीटरमधुन माझ्या दुकानात वीज वापरत असल्यामुळे मला माझे नावे नवीन व्यावसायिक वीज कनेक्शन घ्यावयाचे होते. म्हणुन मी माझ्या इलेक्ट्रॉनिक्स व्यवसायाकरीता नवीन व्यावसायिक वीज कनेक्शन आवश्यक असलेने दिनांक 26/09/2025 रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड यांना ऑनलाईन अर्ज केला होता. मी केलेल्या अर्जाचा ॲप्लीकेशन आयडी 70441071 असा असुन तसेच ग्राहक क्रमांक 204013058461 असा आहे. तसेच त्यासोबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर केली होती. त्यानंतर दिनांक 28/09/2025 रोजी मी नविन व्यावसायिक वीज कनेक्शन साठी ऑनलाईन चलन असलेली फी 4,770/- रुपये ऑनलाईन भरले आहे.
त्यानंतर 15 दिवसापुर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड शाखा दहिवडी येथील दहिवडी शहर लाईनमन म्हणुन नेमणुकीस असलेले लाईनमन महालिंगे हे माझ्या प्रविण इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रीकल्स दुकानात येवुन पाहणी करुन गेले होते. त्यानंतर दिनांक 04/11/2025 रोजी दुपारी लाईनमन महालिंगे हे पुन्हा माझ्या दुकानात आले व त्यांनी माझ्या नविन व्यावसायिक वीज कनेक्शन जोडणेकरीता 12,000/- रुपये द्यावे लागतील असे मला सांगितले. लाईनमन महालिंगे यांना पैसे दिले नाहीत तर ते माझे नवीन व्यावसायिक वीज जोडणीचे काम करणार नाहीत त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने पैसे देण्यास होकार दिला.

लाईनमन महालिंगे हे माझे नवीन व्यावसायिक वीज जोडणीचे काम करण्यासाठी माझ्याकडे मागणी करीत असलेले 12,000/- रु ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. परंतु ती लाच रक्कम त्यांना देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

मी आज दिनांक 06/11/2025 रोजी लाईनमन महालिंगे यांची एमएसईबी कार्यालय दहिवडी येथे भेट घेवुन त्यांचेशी लाचेच्या रक्कमेबाबत चर्चा करणार आहे. तरी त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. माझेत व लाईनमन महालिंगे यांचेत कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत अगर पुर्ववैमनस्य नाही. वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. प्रकाश शिंदे यांचेकडे महालिंगे लाईनमन हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये एमएम कार्डस कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 11.23 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार शिंदे व पंच पंच क्र.1 सोमनाथ देशमुख पंच क्र. 02 दिपक गुरव यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले.

त्यानंतर तक्रारदार शिंदे यांनी महालिंगे लाईनमन कोठे आहेत याची खात्री करण्यासाठी त्यांचा मोबाईल क्रमांक 9423504877 वरुन महालिंगे लाईनमन यांचा मोबाईल क्रमांक 9766669140 वर फोन केला असता महालिंगे लाईनमन यांनी ते फलटण येथे असल्याचे सांगीतले व "अजुन एक दीड तास तरी लागल रस्ता खराब झालाय आपला" असे तक्रारदार यांना सांगीतले. त्यावर तक्रारदार "अरे र् र् .... ठिक हाय चालतयं, आल्यानंतर एक कॉल करा मला, ते आज विषय मिटवुन टाकु म्हंजी परत टेन्शन नाय" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर बंद केले ती वेळ 11.28 वा. ची होती.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथक सनी ग्राउंड दहिवडी येथेच थांबुन राहीलो. त्यानंतर महालिंगे लाईनमन दहिवडी येथे आले आहेत का याची खात्री करण्यासाठी तक्रारदार यांनी 13.11 वाजता व 14.46 वाजता. महालिंगे लाईनमन यांना फोन केला परंतु त्यांनी फोन उचचला नाही. त्यानंतर 15.53 वा. तक्रारदार यांना महालिंगे लाईनमन यांचा फोन आला त्यावेळी महालिंगे लाईनमन यांनी तक्रारदार यांना झुंबड हॉटेल दहिवडी येथे भेटण्यास बोलविले.

महालिंगे लाईनमन यांनी तक्रारदार यांना झुंबड हॉटेल दहिवडी येथे भेटण्यास बोलाविल्याने तक्रारदार यांना महालिंगे लाईनमन यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने दिलेल्या सुचनांची पुन्हा उजळणी केली व त्यांना योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर 16.10 वा. चालू करून तक्रारदार श्री. शिंदे यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. सोमनाथ देशमुख यांचेसह पडताळणीकामी सनी ग्राउंड दहिवडी येथुन तक्रारदार यांचे दुचाकीवरुन रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे सनी ग्राउंड, दहिवडी येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने

तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16.19 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 देशमुख यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे झुंबड हॉटेल दहिवडी येथे गेलो असता सदर ठिकाणी तक्रारदार शिंदे हे जावुन एका इसमा सोबत बोलु लागले तेव्हा मला ते महालिंगे लाईनमन असल्याचे समजले. त्यावेळी तक्रारदार शिंदे लाईनमन महालिंगे यांना म्हणाले की "सॉरी उशीर झाला का?" त्यावर महालिंगे लाईनमन "नाय, नाय ओ, एक चहा द्या." असे म्हणाले त्यावर तक्रारदार "चहा नको महालिंगे साहेब, लय उशीर वाट बघितली तुमची आज मी" असे म्हणाले. त्यावर महालिंगे "नाय मी हिकडं ह्याला गेलेलो, खडी क्रशर बंद करायच होत, ते मोरे नावाचं" असे म्हणाले व "बर आता काय नियोजन करायच आपण, काय करायचं काय? " असे तक्रारदार यांना म्हणाले त्यावर तक्रारदार "आता काय, तुम्ही म्हणचालं असं, माझं काय विषय हाय, तव्हा, किती करु सांगा फक्त" असे म्हणाले. तेव्हा महालिंगे लाईनमन "हेच व्हय, कनेक्शनच व्हय" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हा म्हणाले तेव्हा लाईनमन महालिंगे हे "पाच द्या की " असे म्हणाले त्यावर तक्रारदार "हा" म्हणाले. त्यावर महालिंगे लाईनमन हे "पाच" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "कधी हुईल" असे विचारले असता महालिंगे यांनी "देईन आता दोन दिवसात बसवुन तुमाला" असे तक्रारदार यांना सांगीतले व पाच दया की मग, कन्डेन्सर चालु करुन देतो असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे "चालतयं, चालतयं.." असे म्हणाले. त्यावर महालिंगे लाईनमन हे ती शिफ्टींगचा काय विषय, झाला का विषय, घेतला का असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ती काय मुन्ना शेठचा घोळ मला काय शिफ्टींगचा विषय कळना, मघाशीच वाद घालतं हुतं, ठरलं चार लाख रुपयेला, एक लाख तुम्हाला म्हटलं नाय का काढायची हाय, चार लाख रुपयांत ठरलं आणि ते आता म्हणत्यात आपल्या दोघांच हाय, मला त्यावेळी सांगितलं समधी जण हायत म्हणाल, मला लाख रुपये सांगितलं, राहिलेलं दोन लाख का नाय ,तेवढं हु द्या मग ते दोनच तेवढं तुम्ही करुन द्या. असे म्हणाले. त्यावर लाईनमन महालिंगे "खाडे म्हणलं, आम्हाला चार का साडेचार राहिलेलं हुतं." असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार "आ.. पाच हजार आणतो, घेवुन आलो" असे म्हणाले. त्यावर लाईनमन शिंदे हा असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आ... ठिक हाय पंधरा वीस मिनिटांत आलो... आलो" असे म्हणाले. त्यानंतर मी तक्रारदार यांचे सोबत झुंबड हॉटेलच्या बाहेर आलो व तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनावरुन पुन्हा सनी ग्राउंड येथे 16.19 वा.चे सुमारास परत आलो. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकर्त मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे महालिंगे लाईनमन, एमएसईबी ऑफिस दहिवडी यांचेकडे दिनांक 06/11/2025 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये महालिंगे लाईनमन यांनी तक्रारदार यांचे नवीन विद्युत कनेक्शन जोडण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचे समक्ष केल्याचे तसेच लाच रक्कम घेवुन झुंबड हॉटेल दहिवडी येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार प्रकाश शिंदे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार शिंदे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 5,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोशि थोरात यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र.02 गुरव यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले.
त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहवा ताटे हे त्यांचे मोबाईल फोन मध्ये करणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर त्यांचे मोबाईल फोनमध्ये नवीन सिलबंद मेमरी कार्ड टाकण्यात आले.

त्यानंतर आम्ही शासकिय वाहनामध्ये काळया पडदयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार शिंदे यांना अंन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक चालक पोहवा पुजारी यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोहवा पुजारी यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा चालक पोहवा पुजारी यांनी कापसाच्या बोळ्याने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर चालक पोहवा पुजारी यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 5000/- तक्रारदार शिंदे यांचे शर्टचे पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर पोहवा पुजारी यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 16.49 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार प्रकाश शिंदे त्यानंतर पंच क्र.01 श्री.

देशमुख व पंच क्र.02 गुरव यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन देऊन महालिंगे लाईनमन यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार व पंच नंबर 1 यांना तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन रवाना केले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे सनी ग्राउंड येथुन शासकिय वाहनातुन रवाना होऊन तक्रारदार हे झुंबड हॉटेलच्या जवळ जावुन थांबलेनंतर काही अंतरावर शासकिय वाहन थांबवले. त्यानंतर हॉटेलचे आसपास सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले. तक्रारदार व पंच क्र. 01 हे झुंबड हॉटेल येथे गेले व हॉटेलचे बाहेरील खुर्चीवर बसुन तेथेच थांबुन राहीले. थोडया वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला असता आम्ही झुंबड हॉटेल येथे जावुन तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 17.24 वा ची होती. तेव्हा आडोशास थांबुन राहीलेल्या सापळा पथकातील पोशि शिंदे व पोशि थोरात यांनी महालिंगे लाईनमन यांचा अनुक्रमे डावा व उजवा हात पकडला ती वेळ 17.25 वा ची होती. त्यावेळी यापुर्वी दिल्या सुचना दिलेप्रमाणे पोहवा ताटे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. त्यानंतर महालिंगे लाईनमन यांना पोशि शिंदे व थोरात यांनी दोन्ही हात घट्ट पकडुन अटकावुन ठेवले. तेव्हा आम्ही महालिंगे लाईनमन यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव राहुल अंगदराव महालिंगे, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी प्रधान तत्रज्ञ (लाईनमन) वर्ग - 3, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शाखा दहिवडी शहर ता.माण जि.सातारा रा. रुम नंबर 24, ए विंग तिसरा मजला, अयोध्या पार्क, कोळकी फलटण ता.फलटण जि. सातारा असे असल्याचे सांगीतले.

त्यांनतर तक्रारदार यांना महालिंगे लाईनमन यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी महालिंगे लाईनमन यांना "पाच हायत" असे म्हणुन माझे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढुन महालिंगे लाईनमन यांचे पुढे धरली असता त्यांनी उजव्या हाताने लाच रकमेचा स्विकार करुन त्यांचे शर्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार पंच क्र.02 श्री. गुरव यांनी महालिंगे लाईनमन यांचे खिशातील लाच रक्कम काढुन त्यांचे ताब्यात घेतली. त्यावेळी लाच रकमेच्या नोटांचे नंबर आणि पंच क्र. 02 यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र.02 श्री. गुरव यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर झुंबड हॉटेलमधील लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये महालिंगे लाईनमन यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता महालिंगे लाईनमन यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पेऱ्यावर निळसर चकाकी दिसुन आली.तसेच हस्तगत केलेल्या 5000/- रुपये लाच रकमेस अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच पंच क्र. 02 यांचे हातासही ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्याचे उजवे हातास ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक महालिंगे लाईनमन यांना तक्रारदार यांचे कामाबाबतचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर कागदपत्रे ही एमएसईबी ऑफिस दहिवडी येथे असल्याचे सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांचे कामाची कागदपत्रे एमएसईबी ऑफिस दहिवडी येथुन जावुन पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यावेळी पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोनमध्ये कागदपत्रे जप्तीच्या कारवाईचे छायाचित्रण केले आहे.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई नगरपंचायत हॉल दहिवडी ता.माण जि.सातारा येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. नगरपंचायत हॉल दहिवडी येथे आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन झुंबड हॉटेल येथे गेलो तेव्हा तेथे महालिंगे लाईनमन हजर नव्हते. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांना फोन केला असता त्यांनी सुरवातीला फोन उचचले नाहीत. त्यामुळे मी व तक्रारदार एमएसईबी ऑफिस येथे गेलो तेथेही महालिंगे लाईनमन हजर नसल्याने मी व तक्रारदार पुन्हा झुंबड हॉटेलमध्ये येवुन थांबुन राहीलो. थोडयावेळाने तक्रारदार यांना महालिंगे लाईनमन यांचा फोन आला तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना झुंबड हॉटेल येथे थांबलो असल्याचे सांगीतले. तेव्हा महालिंगे लाईनमन झुंबड हॉटेल येथे आले तेव्हा तक्रारदार व त्यांचेत कामाबाबत चर्चा झाली तेव्हा तक्रारदार त्यांना "पाच हायत" असे म्हणाले व त्यांचेकडील 5000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांनी उजव्या हाताने शर्टचे खिशातुन काढुन महालिंगे यांचे समोर धरली. तेव्हा महालिंगे यांनी लाच रकमेचा उजव्या हाताने स्विकार करुन त्यांचे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिशात लाच रक्कम ठेवुन दिली. तेव्हा महालिंगे लाइनमन तक्रारदार यांना "तुमाला उद्या पर्वा चालु करुन द्याला लावतो, उद्या किंवा पर्वादिशी मिटर येवुन जाईल" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार बर म्हणाले. तेव्हा लाईनमन महालिंगे हे "सोमवारच्या आत देतो चालु करुन तुमाला" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "बर काय अडचण नाय"

असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी महालिंगे यांचेशी कामाबाबत चर्चा केली व डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने महालिंगे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

तरी दिनांक 06/11/2025 रोजी तक्रारदार प्रकाश तात्याबा शिंदे रा. दहिवडी ता.माण जि.सातारा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 06/11/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान झुंबड हॉटेल दहिवडी ता.माण जि.सातारा येथे तक्रारदार प्रकाश शिंदे यांचे नवीन विद्युत कनेक्शन जोडण्यासाठी शासकीय फी भरलेली असतानाही आरोपी लोकसेवक राहुल अंगदराव महालिंगे, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी प्रधान तत्रज्ञ (लाईनमन) वर्ग - 3, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शाखा दहिवडी शहर ता.माण जि.सातारा रा. रुम नंबर 24, ए विंग तिसरा मजला, अयोध्या पार्क, कोळकी फलटण ता.फलटण जि.सातारा यांनी पंच नंबर 1 यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन 5000/- रुपये लाच रक्कम सापळा कारवाईवेळी झुंबड हॉटेल दहिवडी येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन त्यांनी वैध परिश्रमीकाशिवाय अन्य परितोषण, प्रलोभन, बक्षिस म्हणून आर्थिक फायदा मिळविलेला आहे म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dattatray parshuram darade(I (Inspector)) / dgpdndm8906 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**
07/11/25

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

पो.स्टे. ऑफिसर

**Name (नाव):** dattatray parshuram
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** dgpdpdm8906